**कार्यालय पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर**

*2 रा माळा प्रशासकीय इमारत क्र. 1, सिव्हील लाईन्स, नागपूर*

*दुरध्वणी क्र. 0712 2561520 ईमेल आयडी* spacbnagpur@mahapolice.gov.in

# प्रेसनोट

## नागपूर महाराष्ट्र विज वितरण विभाग, येरखेडा येथील सहायक अभियंता यांचेविरूध्द **A.C.B.** नागपूर पथकाने केली यशस्वी सापळा कारवाई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर येथे तक्रारदार यांनी समक्ष येवून तक्रार नोंद केली की, तक्रारदार यांनी त्यांचे दुकानासाठी १९ किलोव्हॅटचे इलेक्ट्रिक कनेक्श्न मिळणेकामी महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी डिस्ट्रीब्युशन बोर्ड कडे ऑनलाईन अर्ज केला होता. यातील आरोपी लोकसेवक श्री अविनाश लक्ष्मण दांडेकर, वय ३४ वर्षे, पद - सहायक अभियंता, महाराष्ट्र वीज वितरण विभाग, येरखेडा, कामठी, जि. नागपूर यांनी १९ किलोव्हॅट क्षमतेचे कनेक्शन देण्यासाठी आवश्यक असलेले डिमांड रक्कम वगळता एक लाख रूपयाची लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांचेशी तडजोडी नंतर भरणा करावयाच्या सिक्युरिटी डिमांड रक्कमेसह एक लाख दहा हजार रूपये देणे बाबत आरोपी लोकसेवक श्री अविनाश दांडेकर यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केली. त्यापैकी आरोपी लोकसेवक श्री अविनाश दांडेकर यांनी तक्रारदार यांचेकडून ऑनलाईन एक लाख रूपये घेतले. यासंबंधी तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे तक्रार दिली.

तक्रारदार यांचे तक्रारीवरून सापळा अधिकारी यांनी लाचेची मागणीबाबत पडताळणी कारवाई केली असता आरोपी लोकसेवक श्री अविनाश दांडेकर यांनी तक्रारदार यांचेकडे लाच मागणीपैकी उर्वरित दहा हजार रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने सापळा कारवाईअंती आरोपी लोकसेवक श्री अविनाश दांडेकर यांना त्यांचेच कार्यालयात दहा हजार रूपये लाच स्विकारतांना ताब्यात घेतले. आरोपी लोकसेवक विरूध्द पोलीस स्टेशन नविन कामठी, नागपूर शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई ही डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्रीमती शुभांगी वानखेडे, पोलीस निरीक्षक श्री रविन्द्र सहारे, श्रीमती वैशाठी आठवले, मपोहवा

अस्मिता मल्लेलवार, अनिल बहिरे, अमोल मेंगरे चालक मपोशि हर्षलता भरडकर, पोशि विजय साळुंखे यांनी केलेली आहे.

नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्हयांतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (ऐजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशिर शासकीय शुल्का व्यतिरिक्त लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे संपर्क साधावा. तक्रारदारांच्या तक्रारीवर तातडीने कारवाई करण्यात येईल व तक्रारदार यांचे सापळा कारवाईत वापरण्यात आलेली रक्कम ही १ महिण्याचे आत परत केल्या जाईल. तसेच तक्रारदारांचे शासकीय विभागात अडकलेले वैध कामही पुर्ण करून दिले जाईल.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा**

**१.** पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. ०७१२-२५६१५२०,
**२.** टोल फ्री क्रमांक : १०६४, व्हॉट्सअॅप क्र. ९०६७६७१०६४
**३.** डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१८५५६६
**४.** श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ७०३८४३६४४१
**५.** श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१४२५६९
**६.** श्री. राजीव कर्मलवार ,वाचक पोलीस निरीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९०२१४५२७६०